पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०७२५२-२३२१३४.
ई -मेल:- sp.washim@mahapolice.gov.in.
संकेतस्थळ :- www.washimpolice.gov.in.

क्रमांक:-पोअवा/आलि.-२,३,४व ६/अर्जित रजा/पो.अंमलदार/ 5051 /२०२३, वाशिम. दिनांक :- 3 JUL 2023

## आदेश

वाशिम जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर नेमणूकीस असलेले पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक पदापर्यंतचे पोलीस कर्मचारी जे सध्या कर्तव्यावर कार्यरत आहेत (निलंबीत/अनाधिकृतपणे गैरहजर असलेले कर्मचारी वगळुन) अशा सर्व पोलीस कर्मचारी यांना वित्तीय वर्ष २०२३-२०२४ करीता मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक पोमस/स्विय सहा./बुलढाणा/निरीक्षण/ २०१७ दिनांक १३/०४/२०१७ अन्वये रजेवर सोडल्याचे दिनांकापासून १५+१५ दिवस अर्जित रजा मंजुर करण्यात येत आहे.

२/- सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रमुख/राखीव पोलीस निरीक्षक पो.मु.वाशिम यांनी त्यांच्या आवश्यकतेनुसार व महत्वाचे बंदोबस्त तसेच कायदा व सुव्यवस्थेची परिस्थीती पाहुनच कर्मचाऱ्यांना पाळी प्रमाणे रजेवर सोडावे. तसेच एका वेळी १० टक्के पेक्षा जास्त पोलीस कर्मचारी यांना रजेवर सोडण्यात येवू नये.पोलीस कर्मचारी रजेवर गेल्याचे व परत आल्याचे दिनांक व वेळ आपले स्टे.डा. साना क्रमांकासह अहवाल उलट टपाली या कार्यालयास न चुकता सादर करावा.

३/- तसेच ज्या पोलीस कर्मचारी यांना वित्तीय वर्ष २०२३-२०२४ चे १५ दिवस अर्जित रजा रोखीकरण दिनांक माहे जुलै २०२३ चे अगोदर पाहिजे असल्यास अशा पोलीस कर्मचारी यांनी त्यांचे प्रभारी अधिकारी यांचे मार्फत एकत्रित दि.१३.०६.२०२३ चे विनतारी संदेश नमुन्यात दिल्याप्रमाणे कार्यालयास सादर करावेत.

(बच्चन सिंह)
पोलीस अधीक्षक, वाशिम

प्रति,

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रमुख/राखीव पोलीस निरीक्षक पो.मु.वाशिम (ई-मेल द्वारे).

प्रतिलिपी माहितीस व उचित कार्यवाहीस्तव :-डिपिजी लिपिक/संगणक कक्ष पो.अ. कार्यालय, वाशिम.

२/- संगणक कक्ष यांनी सदरचे आदेश हे पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वांकरीता उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच रापोनि., पो.मु./सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रमुख/सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे संकेतस्थळावर ई-मेल व्दारे त्वरीत पाठविण्यात यावे.

Scanned with OKEN Scanner